# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
०२०— २५६९१२३३
२५६०१२५७
२५६०१२५८
२५६०१२५९

शैक्षणिक विभाग
गणेशखिंड, पुणे—४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
फॅक्स : ०२०—२५६९१२३३
वेबसाइट : www.unipune.ac.in
इ—मेल : dyracademic@unipune.ac.in

संदर्भ क्र. : सीसीओ/१३०६

दिनांक : १९/०६/२०२०

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक.

विषय — शैक्षणिक वर्ष २०२०—२१ वर्षाकरिता अॅडहॉक बेसिस शिक्षक मान्यतेबाबत...

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास खालीलप्रमाणे कळविण्यात येत आहे.

स्थानिक निवड समितीव्दारे केलेल्या प्रक्रियेतून शैक्षणिक वर्ष २०१९—२० करिता काही महाविद्यालयास शिक्षकी पदांना एका शैक्षणिक वर्षाकरिता (अॅडहॉक) मान्यता देण्यात आल्या होत्या. परंतु कोव्हिड १९ च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर टाळेबंदी व संचारबंदीमुळे विहीत प्रक्रिया अद्याप पूर्ण न होऊ शकल्यामुळे अशा हंगामी शिक्षकांना मुदतवाढ देण्याबाबत महाविद्यालयांनी केलेली विनंती विचारधीन होती.

यासंदर्भात प्राप्त आदेशानुसार असे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१९—२० मधील एका शैक्षणिक वर्षाकरिता शिक्षक मान्यता प्राप्त शिक्षकांची मान्यता महाविद्यालयाच्या विनंती वरून शैक्षणिक वर्ष २०२०—२१ चा कालावधी अथवा विहीत प्रक्रियेव्दारे नियमित पद भरती होईपर्यंत यापैकी जे आधी होईल तोपर्यंत मुदतवाढ (Continution) देण्याचा धोरणात्मक निर्णय कोव्हिड १९ च्या पार्श्वभूमीवर विशेष बाब म्हणून घेण्यात आलेला आहे.

ज्या पात्र शिक्षकांनी शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेली असून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची शैक्षणिक वर्ष २०१९—२० करिता शिक्षक मान्यता प्राप्त केलेली आहे. अशा मान्यताप्राप्त शिक्षकांच्या सन २०२०—२१ या एका शैक्षणिक वर्षाकरीता नव्याने नियुक्ती दिलेले आदेश व रूजू अहवाल व संस्थेच्या सन २०२०—२१ या शैक्षणिक वर्षाकरिता शिक्षक मान्यतेची मुदवाढ घेण्यासाठी केलेल्या ठरावासह आणि शैक्षणिक वर्ष २०१९—२० करिता दिलेले विद्यापीठ मान्यतापत्रासह पाठविल्यास अशाच शिक्षकांना विशेष बाब म्हणून शैक्षणिक वर्ष २०२०—२१ यासाठी नियुक्तीच्या मान्यतेस मुदतवाढ देण्यात येईल. वरील निर्णय ३१ जुलै २०२० पर्यंत विद्यापीठास प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांना लागु राहिल.

यापुढे असेही कळविण्यात येते की, ज्या पदांना विद्यापीठाची शिक्षकीय मान्यता शैक्षणिक वर्ष २०१९—२० साठी घेतलेली नाही अशी पदे भरताना संस्थेने / महाविद्यालयाने शिक्षकीय पद भरण्यासाठी विहीत प्रक्रियेचा अवलंब करणे बंधनकारक राहील.

या शिक्षक नियुक्तीबाबत काही कायदेशीर व आर्थिक बाबी उद्‌भवल्यास त्यास संपूर्णत: संबंधित संस्था / महाविद्यालय जबाबदार राहील.

कळावे,

आपला,

19/06/2020

सहायक कुलसचिव,
(शैक्षणिक विभाग)